केंन्द्र पुरस्कृत " **स्वजलधारा**"
योजनेच्या अंमलबजावणीसाठी
संस्थात्मक यंत्रणा, अंमलबजावणी
व्यवस्था व निधी वाटपाबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु १००४/प्र.क्र. ४७/पा.पु.०७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ एप्रिल, २००४**

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाने, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम लोकसहभाग, मागणी आधारित, सामूहीक निर्णय प्रक्रिया व विकेन्द्रीत अंमलबजावणी तत्वावर आधारित " **क्षेत्र सुधारणा पथदर्शी प्रकल्प** " म्हणून सन १९९९ पासून देशातील काही निवडक जिल्हयात (ज्यात राज्यातील चार जिल्हयांचा समावेश होता ) सुरु केला.

२. " **क्षेत्र सुधारणा पथदर्शी प्रकल्प** " आता सुधारित करुन तो संपूर्ण देशात राबविण्याचा निर्णय घेतला असून त्याला " **स्वजलधारा** " असे नामाभिधान दिलेले आहे. त्यानंतर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निर्गमित केलेल्या सूचना वेळोवेळी सुधारित करुन केंद्र शासनाने या स्वजलधारा योजनेच्या सविस्तर एकत्रित मागदर्शक सूचना जून २००३ मध्ये निर्गमित केल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांच्या प्रती सर्व जिल्हा परिषदांना वितरित करण्यात आल्या आहेत.

३. स्वजलधारा योजनेच्या या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी ग्राम स्तरावर सोपवितांनाच जिल्हा स्तरावर पंचायत राज व्यवस्थेची व राज्य स्तरावर राज्य शासनाची या योजने प्रती भूमिका व जबाबदारी या मार्गदर्शक सूचनामध्ये विस्ताराने स्पष्ट करण्यात आली आहे.

४. स्वजलधारा योजनेबरोबरच केंद्र पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता अभियान प्रकल्पाची राज्यस्तरांवरुन अपेक्षित अंमलबजावणीही स्वजलधारा योजनेसाठी निश्चित केलेल्या राज्य यंत्रणेमार्फतच होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची सूचना या स्वजलधारा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये देण्यात आली आहे.

५. याकरीता राज्यस्तरावर एक स्वतंत्र " **राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन** " गठीत करणे आवश्यक असून या मिशनला राज्य शासनाकडून संपूर्ण कार्यकारी स्वायतत्ता देण्यात यावी असे मार्गदर्शक सूचनांत नमूद करण्यात आले आहे. तसेच, जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदा मार्फतच या योजनेचे संचालन व नियोजन करण्यात यावे असे या मार्गदर्शक सूचनांमध्ये प्रस्ताविले आहे. योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी ग्राम स्तरावर ग्राम पंचायतीअंतर्गत " **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती** " अशी ग्राम पंचायतीची समिती गठीत करण्यात यावी व या ग्रामस्तर समितीच्यामार्फत नियोजन व अंमलबजावणीसाठी पूरक व सहाय्यकारी

अशी जिल्हास्तर पंचायत राज यंत्रणेची व राज्यस्तर मिशनची भूमिका असावी, यादृष्टीने व्यवस्था निर्माण करण्याची कार्यवाही राज्य शासनाने करावी असे या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद आहे

६. तसेच या योजनेकरीता केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधीचे वहन (Fund Flow), हा निधी स्वतंत्ररित्या ठेवण्याची व्यवस्था, या निधीचा विनियोग, लेखा परिक्षण, विविध स्तरावर प्रशासकीय यंत्रणा, याबाबत राज्य शासनाची व जिल्हा परिषदेची जबाबदारी या सर्व बाबींचा मार्गदर्शक सूचनांमध्ये उल्लेख आहे. त्या अनुषंगाने स्वजलधारा योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा व ग्रामस्तरावर संस्थात्मक व्यवस्था गठीत करणे, राज्य, जिल्हा व ग्रामस्तरावर या योजनेसाठी प्राप्त होणाऱ्या निधीचे वाटप व विनियोग करण्यासाठी मार्गदर्शक सूचनांनुसार व्यवस्था करणे व अंमलबजावणी व्यवस्थेसाठी प्रशासकीय यंत्रणा निश्चित करणे शासनाच्या विचाराधीन होते.

७. तसेच स्वजलधारा योजनेप्रमाणे या तत्वानुसारच राज्यात सुरु असलेला केंद्र पुरस्कृत " **संपूर्ण स्वच्छता अभियान** ", जागतिक बँक पुरस्कृत " **जलस्वराज्य** " प्रकल्प, जर्मन शासन पुरस्कृत KFW प्रणित " **आपलं पाणी** " प्रकल्प व राज्य शासनाने अंगिकारलेल्या याच तत्वावरील आधारीत राज्य व्यापी धोरणानुसार सुरु असलेल्या " **शिवकालीन पाणी साठवण योजना** " आदी प्रकल्पांचा अंमलबजावणीसाठी राज्यात राज्य, जिल्हा व ग्राम स्तरावर ज्या विविध यंत्रणा यापूर्वीच कार्यरत आहेत त्यांचा व केंद्र शासनाने आता स्वजलधारा प्रकल्पासाठी निश्चित केलेल्या यंत्रणाच्या समन्वयातून एकात्मिक पध्दतीने समान तत्वांवरील या कार्यक्रमाची अंमलबजावणी व्हावी, मात्र त्याच वेळी स्वजलधारा योजनेअंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचेही पुरेपुर परिपालन व्हावे यादृष्टीने संयोग (Convergence) साधण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाने स्वजलधारा योजनेच्या, तसेच संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या राज्य स्तरावरुन अपेक्षित संचालन, निधी वितरण, मार्गदर्शन, संनियंत्रण या बाबींच्या अनुषंगाने अपेक्षित कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी " **राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन** " गठीत करुन या मिशन मध्ये " **शिखर समिती** " व " **कार्यकारी समिती** " अशा दोन समित्या पुढीलप्रमाणे गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

**(१) राज्य शिखर समिती :-**

**(अ) समितीची रचना :-**

| | | |
|---|---|---|
| (१) | मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| (२) | प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |
| (३) | प्रधान सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| (४) | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| (५) | प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग | सदस्य |
| (६) | सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| (७) | अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| (८) | महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| (९) | केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| (१०) | शासनाने नेमलेल्या पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील ३ तज्ञ | सदस्य |

**(ब) समितीची कार्यकक्षा :-**

(१) स्वजलधारा योजनेबाबत धोरणात्मक मार्गदर्शन करणे.

(२) केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा विभागासोबत स्वजलधारा योजनेबाबत करण्यात आलेल्या **" समझौता कराराच्या "** अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेणे.

(३) केंद्र शासनाकडून अथवा बाहय सहाय्यित संस्थाकडून (वर्धित वेग ग्राम पाणी पुरवठा कार्यक्रम, उप अभियान व संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम यासह ) पूर्णतः अथवा अंशतः अर्थ सहाय्यित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील योजना विचारांत घेणे व धोरणात्मक बाबी मंजूर करणे.

(४) पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या विशेष प्रकल्पासह सर्व बाबींचे संयोगीकरण (Convergence) करणे.

(५) राज्य शासनाचे विविध विभाग व या कार्यक्रमातील बाबींशी संबंधीत भागीदारांमध्ये समन्वय साधणे.

(६) पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्पाचे भौतिक आणि आर्थिक व्यवस्थापन आणि प्रगतीचे मूल्यमापन व संनियंत्रण करणे.

(७) स्वजलधारा योजनेच्या बांधकामाच्या गुणवत्तेचे स्वतंत्रपणे प्रमाणीकरण करण्याची व्यवस्था करणे.

(८) पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी संपर्क (Communication) व क्षमता विकास कार्यक्रमांना एकत्रित करुन संचालित करणे.

**(क)** राज्य शिखर समितीची बैठक दर ३ महिन्यातून एकदा घेण्यात यावी व एका वर्षात किमान ४ बैठका घेण्यात याव्यात.

**(२) राज्य कार्यकारी समिती :-**

**(अ) समितीची रचना :-**

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| (२) | सह सचिव/उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |
| (३) | विशेष कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |

| | |
|---|---|
| (४) सदस्य सचिव , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| (५) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| (६) उप सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| (७) उप सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| (८) उप सचिव, समाजकल्याण विभाग | सदस्य |
| (९) उप सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| (१०) उप सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| (११) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग | सदस्य |
| (१२) पाणी पुरवठा, ग्रामविकास, सामूहिक आरोग्य, स्वच्छता, सामुदायिक संघटना, प्रसार माध्यमे व सेवाभावी संस्था अशा क्षेत्रातील ६ तज्ञ | स्वीकृत सदस्य |

**(ब) समितीची कार्यकक्षा :-**

ही समिती राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची कार्यकारी स्वरुपाची समिती असेल. राज्य मिशनच्या शिखर समितीला सहाय्य करणे व सल्ला देणे ही जबाबदारी सुध्दा या समितीला पार पाडावी लागेल.

२. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेमार्फत या योजनेची अपेक्षित जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढीलप्रमाणे संस्थात्मक व्यवस्थेस शासन मान्यता देत आहे.

**(१) जिल्हा परिषदेअंतर्गत जलसंधारण व पेय जल पुरवठा समिती**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१च या कलम ७९(क) अन्वये गठीत **जलसंधारण व पेय जल पुरवठा समिती** या प्रकल्पाच्या धोरणात्मक बाबींचे संनियंत्रण व संचालन करेल व पुढे नमूद केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली गठीत **जिल्हा कार्यकारी समितीने** तांत्रिक, प्रशासकीय प्रक्रिया व आर्थिकदृष्टया तपासून मंजूर केलेल्या गावांच्या योजनांची वेळोवेळी नोंद घेईल. तसेच स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमाच्या जिल्हयातील अंमलबजावणीचा व प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेईल.

**(२) जिल्हा कार्यकारी समिती**

**(अ) समितीची रचना**

| | |
|---|---|
| (१) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| (२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | सदस्य सचिव |
| (३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद | सदस्य |

| | |
|---|---|
| (४) प्रमुख जिल्हा सुविधा चमु (जलस्वराज्य) (ज्या ठिकाणी पद असेल तेथे) | सदस्य |
| (५) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद | सदस्य |
| (६) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| (७) जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| (८) जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| (९) जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| (१०) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे जिल्हयातील कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| (११) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| (१२) जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| (१३) सेवाभावी संस्थांचे ३ प्रतिनिधी (राज्य मिशनच्या मान्यतेने ) | स्वीकृत सदस्य |

**(ब) समितीची कार्यकक्षा :-**

(१) स्वजलधारा प्रकल्पाचे जिल्हा स्तरावरील (Formulation), व्यवस्थापन व संनियंत्रण करणे.

(२) ग्रामपंचायतींनी स्वतंत्ररित्या अथवा दोन ग्रामपंचायतींनी एकत्रित सादर केलेल्या अथवा पंचायत समितीने सादर केलेल्या पाणी पुरवठा विषयक योजनांची छाननी करणे व त्याला तांत्रिक, प्रशासकीय, आर्थिक व प्रक्रिया बाबत तपासून मंजूरी देणे.

(३) राज्य शासनाने ठरवून दिलेला निकष व पध्दतीनुसार समूह चेतना निर्मिती (Community Mobilisation), क्षमता विकास, समूह संवाद, प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रचार, प्रसिध्दी याकरीता सेवाभावी संस्था, इतर सक्षम संस्था अथवा सल्लागार यांची पारदर्शक पध्दतीने निवड करणे, त्यांच्यासोबत समझौता करार करणे.

(४) स्वजलधारा योजनेच्या तत्वांच्या अंमलबजावणीबाबत लोकप्रतिनिधी, अधिकारी व सर्व सामान्य नागरीक यांच्यात जागृती निर्माण करणे.

(५) क्षमता विकासासाठी व प्रचार प्रसिध्दीसाठी शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार प्रशिक्षण देण्याकरीता व क्षमता विकासासाठी योग्य संस्थांना काम सोपविणे.

(६) राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन, राज्य शासन व केंद्र शासन यांच्याबरोबर संवाद व समन्वय साधणे.

**(क)** समितीची बैठक आवश्यकतेनुसार घेण्यात यावी.

**(ड)** स्वजलधारा योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीकडून प्राप्त प्रस्तावांना प्रशासकीय, तांत्रिक, आर्थिक व प्रक्रिया मंजूरी एक खिडकी (one window) पध्दतीने एकाच सभेत देण्यात यावी. प्रस्तावांची पूर्व तपासणी आवश्यकतेनुसार पुढे नमूद केलेल्या गाभा गटाकडून (Core Group) प्रथम करुन घेण्यात यावी, जेणेकरुन समितीला प्रशासकीय, तांत्रिक, आर्थिक व प्रक्रिया मंजूरी एकाच सभेत देणे सुलभ होईल.

**(इ)** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जे या समितीचे अध्यक्ष आहेत, त्यांचे अथवा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद जे समितीचे सदस्य सचिव आहेत त्यांच्या कार्यालयाची जागा, साधनसामुग्री, वाहन, टेलीफोन इ.चा अथवा जिल्हा परिषदेतील इतर विभागातील वरील बाबींचा कार्यकारी समितीच्या कामकाजासाठी उपयोग करतील. मात्र यासाठी येणारा आवर्ती खर्च, जसे **वाहनासाठी इंधन खर्च अथवा वाहतुकीचा/प्रवासाचा खर्च, टेलिफोन बिलाची देयके इ.स्वजलधारा योजनेत उपलब्ध प्रशासकीय प्रचार, प्रसिध्दीच्या खर्चातून करता येईल.** मात्र कोणत्याही परिस्थितीत **स्वतंत्र वाहन विकत घेता येणार नाही.** फारच आवश्यकता असल्यास स्वजलधारा प्रकल्पाच्या वापरासाठी दीर्घकालीन तत्वावर वाहने भाडयाने घेता येतील.

**(३) गाभा गट (Core Group)**

**(अ) गाभा गटाची रचना**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यकारी समितीला प्रकल्प अंमलबजावणीसाठी सहाय्य करण्यास्तव खालीलप्रमाणे व्यावसायिकांचा (Professionals) एक गाभा गट गठीत करण्यात यावा.

(१) समूह विकास तज्ञ

(२) पाणी पुरवठा तज्ञ

(३) अभियांत्रिकी तज्ञ

(४) ग्रामीण विकास तज्ञ

(५) समाजशास्त्र तज्ञ

(६) सामाजिक विज्ञान तज्ञ

(७) संवाद( IEC) तज्ञ

(८) मनुष्यबळ विकास तज्ञ

(९) प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक इतर तज्ञ

**(ब)** वरील गाभा गटातील तज्ञ गरजेनुसार पूर्ण वेळ अथवा अर्धवेळ पध्दतीने कामे करतील.

**(क) गाभा गटाची कार्यकक्षा**

(१) स्वजलधारा योजनेची तत्वे ग्रामस्तरापर्यत तसेच पदाधिकारी / अधिकारी यांच्यापर्यत पोहोचविण्यासाठी आवश्यक संवाद पध्दतीने विकास, विविध तंत्रज्ञानाची गांवाना करुन द्यावयाची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताची दीर्घकालीन पध्दतीने वापर करण्याचे नियोजन, समूह आरोग्य, योजनेची आर्थिक सक्षमता इ.बाबीवर तसेच जिल्हा कार्यकारी समितीने, गांवाकडून आलेल्या योजनांची आर्थिक, तांत्रिक, प्रक्रिया, प्रशासकीय मान्यता देण्याच्या दृष्टीने आवश्यक पूर्व तपासणीसारखी इ.कामे गाभा गटाकडून करुन घेता येतील.

(२) गाभा गट आवश्यकतेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अथवा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांच्या मागदर्शनाखाली विचारविनिमय करण्यासाठी बैठक घेऊ शकेल. मात्र या गटाची महिन्यातून किमान एक बैठक घेणे बंधनकारक राहील.

(३) या बैठकीमध्ये स्वजलधारा योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने सर्वंकष विचारविनिमय करण्यात यावा.

**(ड)** गाभा गटाला तज्ञ उपलब्ध करुन घेण्यासाठी केंद्र शासन प्रकल्प निधीतून काही प्रमाणात आर्थिक मदत करेल. या तज्ञांनी चमू पध्दतीने काम करणे अपेक्षित आहे. प्रत्येक जिल्हयाच्या गाभा गटात निश्चित किती व कोणते तज्ञ घेता येतील, त्यांचा कालावधी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, त्यांचा मेहताना, इ.बाबत केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनांच्या अनुषंगाने स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

**३.** ग्राम स्तरावर या योजनेची अपेक्षित जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढीलप्रमाणे संस्थात्मक व्यवस्थेस शासन मान्यता देत आहे.

**(अ) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती**

(१) एका गावाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेसाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम-४९ अन्वये गठीत **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती** एका ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी समिती म्हणून कार्यरत राहील.

(२) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम-४९ मधील तरतूदी नुसार ग्रामपंचायतीने ग्राम सभेत या समितीची निवड करावी या समितीचे अध्यक्ष ग्रामपंचायतीचे सरपंच अथवा पंचायतीचे इतर कोणतेही सदस्य अथवा ग्रामसभेने निवडलेले गावात राहणाऱ्या मतदारांपैकी ग्रामसभेत ठरविल्याप्रमाणे असू शकतील.

(३) तसेच ग्रामपंचायती अंतर्गत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे कामकाज योग्य पध्दतीने चालले आहे हे तपासून त्याची माहिती ग्रामपंचायत व ग्रामसभेला वेळोवेळी देण्यासाठी ग्राम सभेत गठीत केलेली सामाजिक लेखा परिक्षण समिती कार्यरत राहील.

(४) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची तसेच सामाजिक लेखा परिक्षण समितीची निवड करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे व कायदेशीर तरतूदींचे योग्य पालन करण्यात यावे.

(५) एकापेक्षा जास्त ग्रामपंचायती एकत्र येऊन योजना राबवावयाचा त्यांचा निर्णय झाल्यास मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम-४९ अन्वये प्रत्येक ग्रामपंचायतीच्या निवडलेल्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांनी** एकत्रित येऊन बैठक घ्यावी व **संयुक्त पाणी पुरवठा व स्वच्छता समिती** गठीत करावी. या संयुक्त समितीला योजनेत सम्मिलित सर्व अंमलबजावणीचे अधिकार असतील. तसेच या संयुक्त समितीवर ही सर्व गावे ज्या पंचायत समिती सदस्य व जिल्हा परिषद सदस्य यांचे मतदार संघात येत असतील ते या संयुक्त समितीवर पदसिध्द (Ex-Offico) सदस्य असतील. ही समिती आपले पदाधिकारी निवडील. जिल्हा परिषदेला अशा संयुक्त ग्रामपंचायतीने राबवावयाच्या योजनांना मान्यता देणे आवश्यक राहील.

(६) ग्रामपंचायतीला या योजनेअंतर्गत प्राप्त झालेला निधी बँकेतून मंजूर योजनेच्या कामासाठी वितरित करण्याची जबाबदारी ग्राम सभेने निवडलेल्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या** किमान दोन सदस्यांची राहील. यापैकी किमान एक सदस्य महिला असेल, त्याचप्रमाणे एका पेक्षा जास्त गांवाच्या संयुक्त योजनेसाठी निधी बँकेतून काढून वितरित करण्याची जबाबदारी समितीने निवडलेल्या कोणत्याही दोन सदस्यांची राहील. मात्र यापैकीही किमान एक सदस्य महिला असेल.

(७) एका पेक्षा जास्त गावांच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या एकत्रित येऊन संयुक्त समिती गठीत करण्याच्या बैठकीला संबंधीत गट विकास अधिकारी उपस्थित राहतील. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली समिती गठीत करण्याची प्रक्रीया होईल.

(८) ग्राम स्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती गठीत करण्याची प्रक्रिया (Process) राज्य शासनाने **जलस्वराज्य** योजनेअंतर्गत निर्गमित केलेल्या आदेशाच्या तरतूदीनुसार व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम-४९ अन्वये करण्यात येईल.

(९) स्वजलधारा योजनेअंतर्गत जिल्हा कार्यकारी समितीला प्रस्ताव सादर करताना शासनाचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक : ग्रापापु-१००३/प्र.क्र.६४/पापु-०७, दिनांक ४ एप्रिल २००३ अन्वये निर्गमित केलेल्या तपासणी सूचीमध्ये माहिती सादर करणे बंधनकारक राहील.

**(ब) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची कार्यकक्षा :-**

**(१)** ग्रामपंचायतीमार्फत स्वजलधारा योजनेच्या अंमलबजावणीसाठी सरपंचाच्या सहमतीने व सहकार्याने ग्रामसभा आयोजित करणे, तत्पूर्वी महिला ग्राम सभा घेणे, व आवश्यकतेनुसार वार्ड /वस्ती सभा घेणे.

**(२)** स्वजलधारा योजना अंमलबजावणीच्या प्रत्येक चरणात (Phase) सक्रीय समूह सहभाग आणि निर्णय प्रक्रियेत व्यापक सहभाग याची निश्चिती करणे व त्याप्रमाणे कार्यवाही करणे.

**(३)** लोकवर्गणी जमा करणे व त्याचा हिशोब ठेवणे, तसेच श्रमदान करणाऱ्यांच्या बाबतीत हिशोब ठेवून त्यांना रोख वर्गणी देणाऱ्यांपेक्षा जास्त भूर्दंड पडणार नाही त्याची काळजी घेणे, त्यांनी केलेल्या श्रमदानाचा मोबदला नियमानुसार मंजूर प्रकल्पातील मजूरीच्या दरानुसार अदा करणे.

**(४)** ग्रामपंचायतीच्या नावाने स्वजलधारा योजनेसाठी उघडलेले स्वतंत्र खाते चालविणे, त्यामध्ये वेळोवेळी लोकवर्गणी जमा करणे, त्यातून प्रकल्पासाठी आवश्यक खर्च करुन त्यांचे हिशोब ठेवणे, ते ग्रामपंचायत व ग्राम सभेला वेळोवेळी सादर करणे.

**(५)** ग्रामपंचायतीच्या वतीने जिल्हा कार्यकारी समिती सोबत विविध करार अंतिम करणे व त्यावर सहया करणे .

**(६)** पाणी पुरवठा व स्वच्छता बाबीचे नियोजन /आराखडे तयार करुन घेणे, त्यासाठी आवश्यक सल्लागार उपलब्ध करुन घेणे, त्यांचेसोबत करार करुन घेणे व प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार नेमून अथवा समक्ष अंमलबजावणी करणे.

**(७)** मंजूर योजनेसाठी आवश्यक बांधकाम वस्तुंचे संपादन करणे, तसेच मजूर लावून बांधकाम करणे व संनियंत्रणाखाली बांधकाम करुन घेणे अथवा आवश्यकतेनुसार कंत्राटदार पारदर्शक पध्दतीने नेमून काम करुन घेणे, बांधकामाचे परिक्षण करणे, तज्ञांची आवश्यकतेनुसार नेमणूक करणे

**(८)** सामाजिक लेखा परिक्षण समितीला वेळोवेळी सामाजिक लेखा परिक्षण करण्याकरीता सहकार्य करणे, कागदपत्रे उपलब्ध करुन देणे व कामाचा आढावा वेळावेळी ग्रामपंचायतीमार्फत ग्रामसभेला सादर करणे.

(९) पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यावर अथवा बांधकाम सुरु असतांना जिल्हा कार्यकारी समितीबरोबर संयुक्त तपासणीची व्यवस्था करणे, अथवा जिल्हा कार्यकारी समितीने नेमलेल्या बाहेरील स्वतंत्र मूल्यांकन यंत्रणांना सहकार्य करणे व सर्व माहिती उपलब्ध करुन देणे.

(१०) देखभाल दुरुस्तीसाठी व योजनेच्या व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने पाणीपट्टी जमा करणे, हिशोब ठेवणे, ती बॅकेत जमा करणे, योजनेच्या दैनंदिन देखभालीसाठी ग्रामपंचायतीच्या सहमतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे व कामे करवून घेणे.

(११) ग्रामपंचायतीतील पाणी पुरवठा, स्वच्छता व आरोग्य याची सांगड घालून ही जबाबदारी एकात्मिक पध्दतीने राबविण्यासाठी व्यवस्था करणे.

(१२) स्वजलधारा तत्वावर योजना राबविण्यासाठी इतर गांवाना सहकार्य करणे.

४. **स्वजलधारा योजनेसाठी निधी व्यवस्था व वितरण :-**

केंद्र शासन, राज्य शासनाला दरवर्षी स्वजलधारा योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देईल, या निधीचे जिल्हानिहाय वितरण राज्य शासन खालील तत्वानुसार करेलः

(अ) केंद्र शासनाकडून प्राप्त निधीचा विचार करुन सर्व जिल्हयातील पिण्याच्या पाण्याच्या परिस्थितीनुरुप, पारदर्शी निकष ठरवून निधीचे वाटप करणे. हे वाटप दरवर्षी ३० एप्रिल पर्यत करावे.

(ब) दिलेल्या निधीनुसार जुन्या योजनांची गरज विचारांत घेवून जिल्हयांना ग्रामपंचायतीकडून पारदर्शक पध्दतीने खुल्या जाहीरातीव्दारे प्राप्त झालेल्या प्रस्तावा आधारे व दरवर्षी ३० सप्टेंबर पर्यत निधी मंजूर करणे.

५. **स्वजलधारा योजनेसाठी निधी वहन (Fund Flow) :-**

(अ) राज्य शासनाकडे प्राप्त झालेला निधी राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या राज्य स्तरावरील स्वतंत्र खात्यात अथवा केंद्र शासनाचे सूचनेनुसार जिल्हा स्तरावरील जिल्हा परिषदेतील स्वजलधारा योजनेच्या स्वतंत्र बॅंक खात्यात १५ दिवसांत जमा करण्यात येईल.

(ब) राज्य स्तरावर राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या नावाने स्टेट बॅकेत एक स्वतंत्र खाते उघडण्यात यावे. हे खाते चालविण्याचे अधिकार व जबाबदारी राज्य मिशनच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांची राहील.

(क) जिल्हास्तरावर जिल्हा परिषदेत स्वजलधारा प्रकल्पाच्या निधीसाठी स्वतंत्र खाते स्टेट बॅंक ऑफ इंडियामध्ये उघडून निधी या खात्यात जमा करण्यात यावा. हे खाते चालविण्याची जबाबदारी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांची राहील.

(ड) ग्रामस्तरावर ग्रामपंचायतीअंतर्गत स्वजलधारा योजनेच्या स्वतंत्र बँक खात्यात प्राप्त निधी जमा करुन तो ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर चालविण्याची जबाबदारी राहील.

६. स्वजलधारा प्रकल्पाच्या राज्यस्तरावरुन करावयाच्या अपेक्षित संनियंत्रण, निरीक्षण, मागदर्शन व समन्वयासाठी राज्यस्तरावर पुढील प्रमाणे एक कक्ष उपलब्ध करुन देण्यात येईल. हा कक्ष संचालक तथा उपसचिव (RSPMU) यांचे कार्यालयात स्थित राहील. राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मीशनचे ते राज्यस्तर कार्यालय असेल व हा कक्ष प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत राहील.

**(अ) राज्य स्वजलधारा कक्षाची रचना.**

**(१) प्रकल्प व्यवस्थापक (स्वजलधारा)** — **एक पद**

(म.जी.प्रा.तील कार्यकारी अभियंता या दर्जाचे वर्ग-१ चे तांत्रिक अधिकारी )

**(२) सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक** — **एक पद**

(म.जी.प्रा.तील सहाय्यक अभियंता दर्जाचे अथवा भू.स.वि.यं.मधील सहाय्यक भूवैज्ञानिक दर्जाचे अधिकारी )

**(३) सहाय्यक -** — **एक पद**

(मंत्रालयातील सहाय्यक श्रेणीतील कर्मचारी असतील. ते स्वजलधाराचे कार्यालयीन कामकाज पहातील.)

**(४) एम्आयएस् समन्वयक व प्रशासन व्यवस्थापक** — **दोन पदे**

(स्वजलधारा प्रकल्पाची सर्व कागदपत्रे अहवाल इ.ची जबाबदारी सांभाळतील)

(ब) वरील पदे तूर्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे व मंत्रालयातील सध्याच्या अधिका-यांतून व कर्मचा-यांतून नवीन पदे निर्माण न करता या प्रकल्पाच्या कामासाठी वापरण्यास शासन मान्यता देत आहे. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता हे याबाबत आवश्यक कार्यवाही करतील. स्वजलधारा प्रकल्पाकरीता स्वतंत्र पदे निर्माण करुन कक्ष निर्माण करण्याबाबत कामाचा व्याप पाहून निर्णय घेण्यात येईल.

(क) राज्यस्तर कक्षात कंत्राटी पध्दतीने आणखी काही तज्ञांच्या नेमणूका करण्यासाठी स्वजलधारा योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील परि.१५.८ व परि. १५.९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन करु शकेल.

७) **प्रकल्पातील योजनांच्या गुणवत्तेमध्ये नियंत्रण**

(अ) जिल्हापरिषदेतील पाणी पुरवठा विभागातील या प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायतीनी घेतलेल्या कामाची गुणवत्ता योग्य राहील यादृष्टीने वेळोवेळी कामाची तपासणी करतील तसेच जिल्हा परिषदेच्या इतर तांत्रिक विभागाची मदतही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आवश्यकतेनुसार घेऊ शकतील.

(ब) कामाच्या गुणवत्तेचे नियंत्रण करण्यासाठी जिल्हा कार्यकारी समिती तज्ञांची चमू गठीत करेल व हा तज्ञ चमू तीन महिन्यातून किमान एकदा कामाना प्रत्यक्ष भेटी देतील व अशा कामांच्या गुणवत्तेची तपासणी करुन अहवाल जिल्हा कार्यकारी समिती व जिल्हा परिषदेच्या जलसंधारण व पेयजल समिती समोर सादर करेल.

(क) कामात दोष आढळून आल्यास अशा दोषांची पूर्तता झाल्याशिवाय ग्रामपंचायतीला काम करण्यासाठी पुढील हप्ता उपलब्ध करुन दिला जाणार नाही याची जबाबदारी जिल्हा कार्यकारी समितीची राहील.

ड) जिल्हा स्तरावरील गुणवत्ता तपासणी शिवाय राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन स्वजलधारा योजने अंतर्गत कामांचे रॅण्डम पध्दतीने तज्ञांचे चमूमार्फत तपासणी करतील. यासाठी पाणी पुरवठा मिशन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा इतर बाहेरील यंत्रणातील तज्ञांचे चमू तयार करुन त्यामार्फत ही तपासणी करुन घेईल. केंद्र शासनाच्या स्वजलधारा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व क्षेत्र सुधारणा प्रक्रियेनुसार योजनांची कामे सुरु आहेत व भौतिक कामाची गुणवत्ता योग्य आहे याबाबतही राज्य मिशन कार्यवाही करेल.

८. **लेखा परिक्षण :**

(अ) स्वजलधारा प्रकल्पाचे हिशोब जिल्हा स्तरावर व ग्रामपंचायत स्तरावर संबंधीत यंत्रणांनी योग्य पध्दतीने ठेवणे आवश्यक आहे. यासाठी मार्गदर्शक सूचनांमध्ये दिलेल्या हिशोबाची पध्दत अवलंबिण्यात यावी व हिशोब मागदर्शक सूचनेतील प्रपत्रानुसार ठेवण्यात यावे.

(ब) जिल्हा व ग्रामस्तरावर ठेवलेल्या हिशोबाचे लेखा परिक्षण करण्यासाठी राज्य मिशन /राज्य शासन लेखा परीक्षकाची नेमणूक करेल.

(क) प्रकल्पाचे वार्षिक लेखे जिल्हा पाणी पुरवठा व जलसंधारण व पेयजल समितीला, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेला राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनला, राज्य शासन व

केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा विभागाला सादर करण्याची जबाबदारी जिल्हा कार्यकारी समितीची राहील. तसेच प्रकल्पाचा पुढील हप्ता प्राप्त करण्यासाठी लेखा परिक्षण, हिशोब व प्रकल्प प्रगती अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

(ड) लेखा परिक्षण अहवालात कोणत्या बाबी अंतर्भूत असाव्यात याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेतील परिच्छेद १७.२ मध्ये नमूद केले आहे त्यानुसार लेखा परिक्षण अहवाल सादर करण्यात यावा.

**९.** स्वजलधारा प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक आदेश निर्गमित करण्याचे अधिकार राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनला असतील. तसेच, प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यांचे वेळोवेळी निरसन करण्याचे अधिकार राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमधील प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखालील राज्य कार्यकारी समितीला असतील.

**१०.** हे आदेश नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६८७/व्यय ३, दिनांक ९.१०.२००३ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई.
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे उप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव
९. राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीचे व कार्यकारी समितीचे सर्व सदस्य.
१०. जिल्हा कार्यकारी समितीचे सर्व सदस्य
११. विभागीय आयुक्त (सर्व)
१२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१३. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१५. जिल्हाधिकारी (सर्व)

१६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१७. मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१८. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१९. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
२०. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२१. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२४.उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२५.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
२६. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग